# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

## सामान्य प्रशासन विभाग
## परिपत्रक/२०२६

सर्व संलग्नित महाविद्यालयीन प्राचार्यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, **दि. २३ ऑगस्ट, २०२६** रोजी विद्यापीठाचा **६८ वा वर्धापनदिन** समारंभ आयोजित केला आहे. या समारंभात महाविद्यालयाने केलेल्या शैक्षणिक प्रगतीचा अहवाल सादर करता येतो.

आपणास विनंती करण्यात येते की, **शैक्षणिक वर्ष २०२५-२६** या कालावधीमधील आपल्या महाविद्यालयाने राबविलेले वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम व केलेल्या प्रगती संबंधीचा अहवाल दि. **१९ ऑगस्ट**, २०२६ पर्यंत पोहोचेल अशा बेताने उपकुलसचिव, सामान्य प्रशासन विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे पाठवावा.

तद्वत, विद्यापीठ वर्धापनदिन कार्यक्रम आपल्या महाविद्यालयात साजरा करून त्याचा अहवाल दि. **३१ ऑगस्ट, २०२६** पर्यंत उपकुलसचिव, सामान्य प्रशासन विभाग यांच्याकडे पाठवून सहकार्य करावे.

विद्यापीठ प्रांगण, )(
छत्रपती संभाजीनगर- ४३१ ००४ )(
संदर्भ :- सा.प्र./२०२६/123 )(
दिनांक :- १३-०८-२०२६ )(

**कुलसचिव**

या परिपत्रकाची प्रतः-

१) प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये
२) जनसंपर्क अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
३) संचालक, युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना देऊन कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावे.